# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.

## जिल्हा-ठाणे.

## प्रारुप मसुदा

**वाहन उभे करणेच्या सार्वजनिक जागांचे उपविधी.**

## DRAFT

# BYE-LAWS REGARDING PUBLIC PARKING PLACES UNDER SECTION (42) READS WITH SECTION 458 (36) & (48) OF BPMC ACT, 1949.

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.**

भिवंडी निजामपूर शहर महानरपालिका सार्वजनिक वाहने उभी करण्याच्या जागांचे संबंधीचे उपविधी.

१)संक्षिप्त नांव व प्रारंभ :-

अ) या उपविधी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सार्वजनिक वाहने उभी करण्याच्या जागांचे नियत्रण संबंधीचे उपविधी संबोधण्यात येईल.

ब) हे उपविधी राज्य शासनाच्या राजपत्रात अंतिमरित्या प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून अंमला येतील.

२) व्याख्या :-

या उपविधीमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षीत नसेल तर-

अ) अधिनियम म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ असा आहे.

ब) कलम म्हणजे अधिनियमाचे कलम.

क) आयुक्त म्हणजे महानगरपालिकेचे आयुक्त. आयुक्त या संज्ञेत कलम ६९(१) नुसार या अधिनियमाच्या तरतूदीपैकी कोणत्याही तरतुदीन्वये किंवा तदनुसार आयुक्त यास प्रदान केलेल किंवा त्याच्याकडे सोपविलेले किंवा त्याच्यामध्ये निहित असलेले कोणतेही अधिकार, कर्तव्य किंवा कामे ही, आयुक्त याबाबत लेखी आदेशाद्वारे सामान्यपणे किंवा विशेषरीत्या ज्याला अधिकार प्रदान करील असा कोणताही महापलिका अधिकारी किंवा कर्मचारी याचा समावेश केला जाईल. अशा रितीने अधिकार प्रदान करण्यात येतील त्या मार्यादेपर्यंत या उपविधींच्या कोणत्याही तरतुदीत आलेल्या आयुक्त या शब्दांत अशा अधिका-याचा समावेश होता असे मानले जाईल.

ड) महापालिका म्हणजे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.

इ) शासन म्हणजे महाराष्ट्र शासन किंवा भारतातील कोणत्याही राज्याचे शासन किंवा केंद्राचे शासन.

फ) व्यक्ती या सज्ञेत व्यक्तीचा समुह, जमाव, वाहन वापरणारी कंपनी किंवा संस्था.

ग) वाहने उभी करण्याच्या सार्वजनिक जागा (पब्लिक पार्कींग प्लेसेस) म्हणजे महापालिका आयुक्तांनी वाहतुकीचे नियमन होणेकरीता आणि सार्वजनिक रस्त्यांतील अडथळे टाळणे करीता किंवा सार्वजनिक रस्त्यांचा दुरुपयोग टाळणे करीता, वाहाने उभी करण्यासाठी अधिसूचित केलेली / जाहिर केलेली जागा.

ह) **सार्वजनिक रस्ता** म्हणजे :-

१) महापालिकेच्या किंवा अन्य सार्वजनिक निधीच्या खर्चाने यापूर्वी समतल करण्यात आलेला, फरसबंदी करण्यात आलेला, खडी घालण्यात आलेला, पाणी वाहून जाण्याकरता पाट काढण्यात आलेला, मलप्रणाल खोदण्यात आलेला किंवा दुरुस्त करण्यात आलेला,किंवा

२) जो कलम २२४ च्या तरतुदीन्वये सार्वजनिक रस्ता म्हणून जाहिर करण्यात आलेला आहे किंवा याअधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदीन्वये सार्वजनिक रस्ता होता, असा कोणताही रस्ता.

३) **वाहन** या संज्ञेत गाडी, छकडा, व्हॅन, खटारा, मालमोटार, हातगाडी, सायकल, तिनचाकी, मोटारगाडी आणि रस्त्यावर वारण्यात येणारे किंवा वापरण्यास योग्य असलेले चाकाचे प्रत्येक वाहन यांचा समावेश होतो.

४) **महापालिकाच्या जागा** म्हणजे महापालिकेच्या मालकीच्या असलेल्या किंवा महापालिकेला प्राप्त झालेल्या किंवा महापालिकेच्या भाडेपट्टयाने घेतलेल्या जागा.

५) **अनधिकृत** वापर म्हणजे कोणत्याही व्यक्तीने महापालिका हद्दीतील महापालिका जागा किंवा सार्वजनिक रस्ता संबंधी परवानगी न घेता केलेला वापर आणि त्यामध्ये कोणत्याही व्यक्तीने महापालिका जागा किंवा सार्वजनिक रस्त्यात परवानगी घेऊन, मात्र परवानगीचा कालावधी संपल्यानंतरही केलला वार याचा सामावेश होतो.

ज्या शब्दांचा व संज्ञेचा वरील व्याख्यामध्ये समावेश करण्यात आलेला नाही, त्याची व्याख्या वा अर्थ या अधिनियमातील तरतुदी नुसार आहे.

**३) वाहने उभी करण्याच्या सार्वजनिक जागा (दि पब्लीक पार्कींग प्लेसेस) अधिसुचित करणे :-**

महापालिका क्षेत्रांत वाहने उभी करण्याच्या जागा आयुक्त अधिसुचित करतील. वाहने उभी करण्याच्या प्रत्येक सार्वजनिक जागांच्या हद्दी, नागरिकांच्या माहितीसाठी मराठी व इंग्लीश मध्ये जाहीर व अधिसुचित करण्यांत येतील.

**४) वाहने उभी करण्याच्या सार्वजनिक जागा नागरिकांच्या खुल्या असण्याच्या वेळा :-**

वाहने उभी करण्याच्या सार्वजनिक जागा दररोज सकाळी ८-०ते रात्री ९-० किंवा आयुक्त वेळोवेळी जी वेळी निश्चित करतील त्या वेळेत नागरिकांसाठी खुल्या राहतील.

**५) वाहने उभी करणे :-**

एखाद्या व्यक्तींस वाहन वापरतांना वाहन उभे करावयाचे असेल तर वाहने उभी करावयाच्या सार्वजनिक जागेतच उभे केले पाहिजे, इतरत्र सार्वजनिक रस्त्यावर कोठेही वाहन उभे करावयाचे नाही. महापालिकेच्या कार्यालयांचे इमारतीत / आवारांत जेथे सर्वसाधारणपणे वाहन उभे करण्यास परवानगी असेल अशा ठेवलेल्या जागेत उभे करावे.

**स्पष्टीकरण :- १)** : यांत्रिक बिघाडामुळे वाहने उभी करण्यासाठीच्या सार्वजनिक जागे व्यतिरिक्त सार्वजनिक रस्त्यांत वाहन उभे केल्यास ते अनिधिकृतपणे उभे करणे (पार्कींग) होणार नाही. मात्र वाहन वापर करणाऱ्यांने वाहन ताबडतोब रस्त्याच्या कडेला हलवून अशा सोयीच्या जागी उभे करावे की, ज्यामुळे वाहतुकीस असुविधा होणार नाही किंवा वाहतुकीच्या प्रवासास अडथळा होणार नाही.

**स्पष्टीकरण :- २)** : या उपविधीतील कलम ५ अन्वये निश्चित केलेल्या वाहने उभी करण्याच्या जागा व्यतिरिक्तच्या जागेत शौचालयास जाणेचे किंवा तशा प्रकारच्या आकस्मिक आणि संयुक्तीक कारणास्तव त्यासाठीच्या उचित कालावधी करिता वाहन उभे केल्यास ते अनधिकृत असणार नाही. मात्र असा अवधी ३ तासापेक्षा अधिक असता कामा नये. तसेच वाहन उभी करण्याचा जागा चालत जाणे शक्य होणाच्या अंतरावर नसले पाहिजे. उलटपक्षी सिध्द केल्या खेरीज एखाद्याचे निवास स्थान किंवा काम करण्याचे ठिकाण सार्वजनिक रस्त्यावर अथवा महापालिका इमारतीत वाहन उभे करण्यासाठीचे अकस्मिक व सयुंक्त कारण समजले जाणार नाही.

अंतर किंवा कारणांची संयुक्तता या बाबत कोणताही वाद निर्माण असल्यास आयुक्तांचा निर्णय अंतिम असले.

या उपविधीच्या कलम ५ (१) अनुसरुन उभ्या केलेल्या (पार्कड) वाहना व्यतिरिक्त कोणाही व्यक्ती कडून सार्वजनिक रस्त्यावर किंवा महापालिका इमारती वगैरे ठिकाणी वाहन उभे केले गेल्यास ते सार्वजनिक रस्ता किंवा महापालिका इमारतीचा अनधिकृत वापर समजले जाईल.

**६) प्रतिबंधित कृत्ये :-**

वाहन उभी करणेसाठीच्या सार्वजनिक जागा आणि महापलिका इमारतीत कोणत्याही व्यक्तीने खालील कृत्ये / गैरवर्तन करु नयेत.

ए) त्या ठिकाणी साखळी किंवा अन्य प्रकारे पुरेशा रितीने बांधलेल्या कुत्र्या खेरीज कोणताही प्राणी त्या ठिकाणी घेऊन जाऊ देऊ नये आणि तेथे राहू देऊ नये.

बी) आयुक्तांच्या परवानगी खेरीज, सार्वजनिक सभा घेणे किंवा कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, भाषण किंवा जमाव करणेस किंवा कोणत्याही प्रकारची मिरवणूक काढणेसाठी कारणीभूत होणारे कृत्य करता कामा नये.

सी) वाहनासाठी प्रतिबंध असलेल्या महापालिका बाजार अथवा तशा प्रकारच्या अन्य ठिकाणी वाहन घेऊन जाता कामा नये.

डी) कोणताही सार्वजनिक उपद्रव.

ई) वाहन उभे करण्यासाठी अनुसूचित केलेल्या कालावधिपेक्षा जास्त काळ वाहन उभे करुन ठेवणे आणि या संबंधात कसुर करणे अनधिकृत वापर समजला जाईल.

एफ) अनुचित किंवा अयोग्य भाषा वापरणे.

जी) भीक मागणे किंवा दान मागणे.

**७) वाहने अनधिकृतपणे उभी करणे :-**

१) अनधिकृतपणे उभ्या केलेल्या वाहनांच्या बाबतीत वाहन पोलिस अधिकाऱ्याच्या मदतीने वाहनाच्या मालकी बाबतचा पुरावा आयुक्त ह्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे सादर केल्या खेरीज आणि यापुढे नमुद केल्याप्रमाणे अनधिकृत वाहन उभे करणे बाबतचे आकार / शुल्क भरल्याखेरीज वाहन परत केले जाणार नाही.

या बाबत प्राधिकृत केलेल्या व रक्कम स्विकारणाऱ्या अधिकाऱ्याने त्या बाबतची पावती दिली पाहिजे.**(फी ची रक्कम परिशिष्ट १मध्ये नमुद केल्या प्रमाणे)**

२) अनधिकृतपणे वाहन उभे करण्याच्या प्रत्येक प्रसंगी वाहन मालकास पुढीलप्रमाणे किंवा महापालिका वेळोवेळी सुधारीत करुन निश्चित करील ती फी दयावी लागेल.

**८) अनधिकृतपणे वाहन उभे करणे संबंधातील वाद आणि तक्रारी :-**

१) या उपविधीतील कलम ५(१) खाली केलेल्या स्पष्टीकरण क्र.२ मध्ये नमुद केलेल्या मुद्या व्यतिरिक्त आयुक्तांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाराच्या निर्णया बाबत कोणाही व्यक्तीस वाद करता येणार नाही.

विवादित प्रकरणातही वाहन मालक / वापर करणाऱ्यास अनधिकृतपणे वाहन उभे केल्या बदलचे आकार भरावे लागतील व पावती स्विकारावी लागेल.

२) उपविधी ५(१) खाली केलेल्या स्पष्टीकरण २ मध्ये नमुद केलेल्या मुद्या बाबत वाद असल्या प्रकरणी वादी यांस आयुक्त / आयुक्तांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे याचिका सादर करता येईल. त्यांचा निर्णय अंतिम असेल, मात्र आयुक्त किंवा उप-आयुक्त जे कोणी असतील त्यांनी निर्णय घेण्यापूर्वी वादीस- सुनावणीची योग्य ती संधी दिली पाहिजे.

जर निर्णय वादीचे बाजुचा असेल तर आयुक्त किंवा उपआयुक्त यांनी तावडतोब वसुल केलेले अकार परत करणेचे आदेश दिले पाहिजेत.

या उपविधींचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस

अ) जास्तीत जास्त रुपये ५००/- (रुपये पाचशे मात्र) पर्यंत दंडाची शिक्षा आणि सिध्द अपराध ठरविण्यात आल्यानंतर, अपराध करणेचे चालू ठेवील अशा प्रत्येक दिवसा बद्दल जास्तीत जास्त रुपये २०/- (रुपये वीस मात्र) प्रतिदिन दंडाची शिक्षा होईल.

ब) अपराध करणे बंद करणेसाठीची आयुक्ताची किंवा त्यांची प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची यासंबंधीची नोटीस प्राप्त झलेनंतरच्या कालावधीत अपराध करणे चालु असल्यास जास्तीत जास्त प्रतिदिन रुपये २०/- (रुपये वीस मात्र) दंडाची शिक्षा होईल.

क) या दंडा व्यतिरितक्त, गैरकृत्या बाबत त्याच्या अधिकारच्या मर्यादेत करणे शक्य आहे तितके उपाय योजणेस फर्मा्विता येईल.

१०) **अनधिकृत वापरा बद्दल दंडात्मक तरतुदी :-**

आयुक्तास-

अ) अनधिकृतपणे वाहन उभे करणे बदल वाहन मालकास आकारलेले शुल्काची रक्कम त्याने भरली नाही तर, त्याचेविरुध्द पुढील कारवाई करता येईल.

ब) या उपविधींच्या कोणत्याही तरतूदींचा भंग करणाऱ्या वाहन मालकाने या उपविधीतील ७(२) मधील तरतूदी नुसार शुल्क व रुपये १००/-पेक्षा जास्त नसलेले तडजोडची रक्कम भरले नंतर आयुक्तांस या उपविधींच्या तरतूदीद्वारे शिक्षापात्र ठरविण्यात आलेला कोणताही अपराध, आपसात मिटविता येईल किंवा अशी कार्यवाही मागे घेता येईल.

११) **अडचणी दूर करण्याची बाबतची तरतूद :-**

या उपविधीतील तरतूदींची अंमलबजावणी करतांना कोणतीही अडचण उद्भवल्यास, त्या प्रसंगी आयुक्त अधिनियम, नियम किंवा या उपविधींतील तरतूदींशी विसंगत नसतील व अडचण दूर करण्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल असे आदेश देऊ शकतील.

आयुक्त,
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,

## परिशिष्ट १

**दर पत्रक :-**

**वाहन तळ शुल्क :**

१) **दिर्घ वास्तव्य :** १२तास पर्यंत ते जास्तीत जास्त ७२ तास.

२) **अल्प वास्तव्य :** ४ तास पर्यंत ते जास्तीत जास्त २४ तास.

३) **लोकोपायोगी सेवा:** १५मिनिटा पर्यंत ते जास्तीत जास्त १२ तास.

| अ.क्र. | खाजगी वाहने | अल्प वास्तव्य | दिर्घ वास्तव्य |
|---|---|---|---|
| १ | सायकल | रु.१/- पहिल्या चार तासा करिता त्यापुढील प्रति तासाकरिता ०.५० व प्रमाणे पूढील. | रु.२/- पहिल्या १२ तासा करिता व त्यापुढील रु.१/- प्रत्येक ६ तासा करिता व त्या प्रमाणे पुढील |
| २ | द चाकी | रु.१/- पहिल्या चार तासा करिता | रु.५/- पहिल्या १२ तासा करिता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | व त्या प्रमाणे पुढील. | करिता व त्या प्रमाणे पुढील. |
| ३ | चार चाकी | रु.५/- पहिल्या चार तासा करिता आणि त्या पुढील रु.३/- प्रत्येक तासा करिता. | रु.१५/- पहिल्या १२ तासा पर्यंत त्या पुढील रु.३/-प्रत्येक तासा करिता. |

**व्यापारी वाहन**

१) दु चाकी / तीन चाकी / चार चाकी / (टॅक्सी / टेम्पो आय.सी.व्ही.)

२) सहा चाकी :- ट्रक / बस / टूरीस्ट बस (पर्यटन वाहन) इ.

पहिल्या दोन तासा करिता रु.१५/-

पहिल्या चार तासा करिता रु.३०/-

पहिल्या सहा तासा करिता रु.५०/-

आणि त्यापुढील रु.१५/- प्रत्येक तासा करिता किंवा त्यापुढील पहिल्या १२ तासा करिता रु.५०/- प्रत्येक तासा करिता किंवा त्यापुढील प्रत्येक तासा करिता रु.१५/-

**टिप :- वरील शुल्क पुढील वाहनांवर लागणार नाही.**

१) भिवंडी नि.श. महानगरपालिकेची वाहने / सरकारी वाहने / शारीरीक विकलांगांची वाहने /रुग्ण वाहीका.

२) लोकउपयोगी सेवा :- हॉस्पीटल, शाळा, मंदीर, मस्जिद, आणि बॅंके जवळ पहिल्या १५ मिनिटांकरिता शुल्क आकारले जाणार नाही. तद्नंतर

अ) दु चाकी ०.५० पैसे, तीस मिनीटा करिता.

ब) चार चाकी १:०० रु. तीस मिनीट करिता.

तीस मिनीटांच्या नंतर १५ मिनीटांला दु चाकी रु.३:००

चार चाकी रु.५:००

वाहने उभी करण्यासाठी निश्चित केलेल्या जागेच्या व्यतिरिक्त वाहने उभी केल्यामुळे मान्यते प्रमाणे आकारण्यांत येणारे दंड:

**दंडणीय शुल्क :**

| अ.क्र. | खाजगी वाहने | दंड | वाहतूक खर्च | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | दोन चाकी | १००/- | ५०/- | १५०/- |
| २ | तीन चाकी | १५०/- | १००/- | २५०/- |
| ३ | चार चाकी | २५०/- | १५०/- | ४००/- |
| **व्यापारी वाहने :** | | | | |
| ४ | तीन चाकी | २५०/- | १००/- | ३५०/- |
| ५ | चार चाकी | ५००/- | १५०/- | ६५०/- |
| ६ | सहा चाकी | ६००/- | ६००/- | १२००/- |
| ७ | सहा चाकी पेक्षा जास्त चाकी वाहनांना | १०००/- | १०००/- | २०००/- |

टिप :- या उपविधी अन्वये दोषी व्यक्तींवर केलेल्या दंडात्मक कारवाई व्यतिरिक्त (इन ॲडिशन) वरील आकार असतील.

सही /-